आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
६ डिसेंबर २०२५ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त राज्यासह देशभरातून आदरांजली

- इंदू मिलच्या जागेवर बाबासाहेबांच्या स्मारकाचं काम पुढल्या वर्षी सहा डिसेंबरच्या आत पूर्ण करण्याची मुख्यमंत्र्यांची ग्वाही

- गेल्या काही दिवसांपासून सुरु असलेल्या अनियमिततेच्या पार्श्वभूमीवर आजही इंडिगोची ४०० हून अधिक उड्डाणं रद्द

**आणि**

- भारत आणि दक्षिण आफ्रिकेदरम्यानच्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात भारताचा नाणेफेक जिंकून क्षेत्ररणाचा निर्णय

**<><><><><>**

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना ७० व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आज राज्यासह देशभरातून आदरांजली वाहिली जात आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु, उपराष्ट्रपती सीपी राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही बाबासाहेबांना आदरांजली वाहिली आहे. संसद भवनात आज लोकसभा सभापती ओम बिर्ला यांच्यासह संसद सदस्यांनी बाबासाहेबांच्या तैलचित्राला पुष्प अर्पण करुन आदरांजली वाहिली.

बाबासाहेबांचं दूरदृष्टी असलेलं नेतृत्व न्याय, समता आणि संविधानाच्या तत्वांवरची त्यांची निष्ठा भारताच्या वाटचालीत महत्त्वाची ठरली आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आपल्या समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. सरंक्षण मंत्री राजनाथ सिंग आणि गृहमंत्री अमित शहा यांनीही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली वाहिली आहे. तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम.के. स्टॅलिन यांनी चेन्नई इथं शालेय विद्यार्थ्यांसमवेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली वाहिली.

**<><><><><>**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आज सकाळी राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, खासदार सुप्रिया सुळे, माजी मंत्री आदित्य ठाकरे यांनी चैत्यभूमीवर जाऊन अभिवादन केलं.

इंदू मिलच्या जागेवर सुरू असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचं काम पुढल्या वर्षी सहा डिसेंबरच्या आत पूर्ण करण्याची ग्वाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिली. बाबासाहेब आंबेडकर यांनी राष्ट्राच्या प्रगतीचा पाया घातल्याचं नमूद करून बाबासाहेबांच्या दूरदृष्टीमुळे आज भारत जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था ठरला असून लवकरच तिसऱ्या क्रमांकावर झेप घेणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. आंबेडकर यांनी उभारलेला संघर्ष हा मानवमुक्तीचा, समता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुता प्रस्थापित करण्याचा होता, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनीही चैत्यभूमीवर जाऊन बाबासाहेबांना अभिवादन केलं.

देशभरातून आंबेडकरी अनुयायी मुंबईत चैत्यभूमीवर दाखल होत असून पहाटेपासूनच अभिवादनासाठी मोठी रांग लागली आहे. महापरिनिर्वाण दिनानिमित्त मुंबई आणि राज्यभरात झालेल्या कार्यक्रमाविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**---व्हीसी---**

*(मुंबई महापालिकेनं चैत्यभूमी आणि परिसरात विविध सुविधा पुरवल्या आहेत. चैत्यभूमी परिसरात समता सैनिक दलाचे जवान आणि पोलिसांनी कडक बंदोबस्त ठेवला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचं मुंबईतील निवासस्थान असलेल्या राजगृह परिसरातही अनुयायी मोठ्या प्रमाणात भेट देत असून त्यांच्यासाठीही पुरेशा व्यवस्था केल्या आहेत. देशाच्या विविध भागातून येणाऱ्या अनुयायांसाठी चैत्यभूमी परिसरात १ लाख चौरस फूटाचा भव्य तंबू उभारण्यात आला असून त्यात चैत्यभूमीचं थेट प्रक्षेपण करणाऱ्या १० एलईडी स्क्रीनही लावण्यात आल्या आहेत. फिरती स्वच्छतागृहे, स्नानगृहे, रुग्णवाहिका आदी व्यवस्थाही करण्यात आली असून विविध ठिकाणी आरोग्य तपासणी केंद्रही स्थापन करण्यात आली असून ५८५ वैद्यकीय कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. मध्य रेल्वेनंही नागपूर,*

*अमरावती, कलबुर्गी आणि कोल्हापूर येथून विशेष अनारक्षित रेल्वेगाड्या सोडल्या असून कल्याण ते परळ उपनगरी रेल्वेच्या १२ अतिरीक्त फेऱ्याही चालवल्या जाणार आहेत.*

*बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आज **धाराशिव** इथं सामाजिक समरसता मंच, केसरीया प्रतिष्ठान, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने रक्तदान शिबिराचं आयोजन करण्यात आलं होतं.*

***नांदेड** येथे महापरिनिर्वाण दिनानिमित्त शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, महापालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी आज अभिवादन केलं.*

***नाशिक** शहरातील सीबीएसवरील पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आलं. तसंच नाशिक शहरात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.*

***अकोल्यात** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने अकोल्यात मध्यरात्री भव्य कॅण्डल मार्च काढण्यात आला.)*

**<><><><><>**

केंद्र सरकार आयकर प्रणाली सुलभ करण्यासाठी काम करत असून यापुढे ती किचकट राहणार नाही, असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत एका खासगी माध्यम संस्थेच्या कार्यक्रमाला त्या आज संबोधित करत होत्या. नागरिकांच्या प्रगतीसाठी आयकर स्लॅब पारदर्शी आणि सुलभ करणं आवश्यक असून सीमाशुल्क चौकटीत फेरबदल करणं हा याचा पुढचा टप्पा आहे, असं त्या म्हणाल्या. गेल्या दोन वर्षांत सीमाशुल्क कमी करण्यात आल्याचं सीतारामन यानी अधोरेखित केलं. मध्यमवर्गीयांची बचत कमी होत नसून ती गुंतवणुकीत परावर्तीत झाली आहे, असंही त्या म्हणाल्या.

**<><><><><>**

इंडिगो विमानांच्या उड्डाणांमध्ये गेल्या काही दिवसांपासून सुरु असलेल्या अनियमिततेच्या पार्श्वभूमीवर आजही इंडिगोची ४०० हुन अधिक उड्डाणं रद्द झाल्याची माहिती वृत्तसंस्थेनं दिली आहे. यापैकी बंगळुरू विमानतळावर १२४, मुंबई विमानतळावर १०९ तर पुणे विमानतळावरच्या ४२ विमानसेवा आज रद्द झाल्या आहेत.

मात्र, विमानउड्डाणांच्या वेळांमधली दिरंगाई तसंच विमानं रद्द होणं आटोक्यात आलं असून विमानतळांवर आता दीर्घकाळ प्रतीक्षा करावी लागणार नसल्याचं नागरी हवाई वाहतूक मंत्री राम मोहन नायडू यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत वार्ताहरांशी बोलत होते. लहान मुलं, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग व्यक्तींना प्रवासात प्राधान्य देण्यासाठी  नागरी हवाई वाहतूक मंत्रालय विमानतळांवर कार्यरत असल्याची माहिती त्यांनी दिली. प्रवाशांना तिकीट दरांचा परतावा त्वरित द्यावा तसंच, वेळेत बदल करून घेतलेल्या प्रवाशांना कोणतेही अतिरिक्त दर लावता कामा नयेत असे निर्देश दिल्याचंही त्यांनी सांगितलं.

दरम्यान, नागरी हवाई वाहतूक मंत्रालय तसंच विमानसेवा नियंत्रकांनी न्यायालयाच्या आदेशाचं कसोशीनं पालन करावं आणि वैमानिक आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य द्यावं असं आवाहन वैमानिक संघटनेनं केलं आहे.

<><><><><>

लोणावळ्यात आज सकाळी कार आणि मिनी ट्रक यांच्या अपघातात गोव्याचे दोन पर्यटक ठार झाले. लायन पॉइंटजवळ ही भरधाव कार आणि ट्रकची समोरासमोर धडक झाली. या अपघातात ट्रकचालकही जखमी झाल्याची माहिती पोलिसांनी दिली.

<><><><><>

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाबा आढाव यांची प्रकृती बिघडली असून गेल्या १० दिवसांपासून त्यांच्यावर पुण्यातल्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांची अवस्था गंभीर पण स्थिर असून ते अतिदक्षता विभागात असल्याची माहिती कुटुंबीयांनी दिली आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी आज रुग्णालयात जाऊन आढाव यांची भेट घेत त्यांच्या कुटुंबीयांकडे प्रकृतीची विचारपूस केली.

<><><><><>

पालघर जिल्ह्यातल्या एका गोदामातून सुमारे ९ टन बंदी घातलेलं प्लास्टिक जप्त केल्याची माहिती पालिका अधिकाऱ्यांनी दिली आहे. वसई विरार महापालिकेनं आजवर केलेली ही सर्वात मोठी जप्ती आहे. गोदाम मालकाला ५ हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे.

<><><><><>

न्यायालयीन प्रक्रियेत एआय अर्थात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्याबाबत जपून पावलं टाकली जात असून अशा प्रकारचं कोणतंही तंत्रज्ञान न्यायालयीन निर्णय प्रक्रियेची जागा घेऊ शकत नाही असं सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे. न्यायालयीन प्रक्रियेत एआय आणि मशिन लर्निंगचं नियमन करण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या पीठासमोर सुनावणी सुरू होती, तेव्हा ही टिप्पणी करण्यात आली. तंत्रज्ञानाच्या बाबतीत न्यायव्यवस्था सावध आहे, न्यायालयीन निर्णय प्रक्रियेला नियंत्रित करण्याची परवानगी एआयला दिली जाणार नाही, असं न्यायमूर्ती सूर्य कांत म्हणाले. न्यायाधीशांचं स्वातंत्र्य आणि मानवी विवेकबुद्धीचं भारतीय न्यायव्यवस्थेतलं स्थान अबाधित राहील असं सूर्यकांत यांनी स्पष्ट केलं.

<><><><><>

भारत आणि दक्षिण आफ्रिके दरम्यानच्या एकदिवसीय मालिकेतला तिसरा आणि शेवटचा सामना विशाखापट्टणम इथं सुरू आहे. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा दक्षिण आफ्रिकेच्या २२ षटकात २ खेळाडू बाद १२६ धावा झाल्या होत्या.

या मालिकेत भारत आणि दक्षिण आफ्रिकेनं प्रत्येकी एक सामना जिंकल्यानं मालिका १-१ अशी बरोबरीत आहे.

//<><><><><>//